# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स - २६९२१०२
तार-EDUTECH E-Mail :- 1) System@dte.org.in 2) Desk15@dte.org.in internet:- http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांक: १५/अर्थसं/ईबीसी/२०१६-१७/ ७०७
दिनांक : 21 SEP 2016

प्रति,
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे , नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर

विषय: खाजगी कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीची योजनेबाबत

संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९/तांशि-४, दि. ३१ मार्च, २०१६

उपरोक्त विषयाबाबत सर्व विभागीय कार्यालयांना कळविण्यात येते की, सदरहू शासन निर्णयातील पात्रतेचा निकषामधील मुद्दा क्र.१ मध्ये सदर योजना ही खाजगी विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनासमवेत शासकीय व अनुदानित महाविद्यालये /तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठातील विनाअनुदानित तत्वावर चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांनाही लागू राहील असे नमुद केले आहे. मात्र दि. १९.०९.२०१६ रोजीच्या मा. उपसचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई येथे सर्व सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्या उपस्थितीत बैठकीत वरील मुद्दा उपस्थित करण्यात आला. सदरहू योजनेबाबत ही योजना खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्था तसेच शासकीय, अशासकीय अनुदानित, शासकीय विद्यापीठात **विनाअनुदानित तत्वावर** चालविल्या जाणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी लागू आहे असे स्पष्ट केले. तरी शासकीय / अशासकीय अनुदानित पदवी, पदविका, व पदव्युत्तर पदवी या संस्थेतील व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना सदर योजना लागु नसल्यामुळे संबधीत विद्यार्थी , संस्था यांनी या योजनेसाठी अर्ज करू नये. आपल्या अधिनस्त सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित संस्था प्रमूखांना आपल्या स्तरावरून सुचित करण्यात यावे.

(डॉ. सुभाष महाजन)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई